आकाशवाणी नागपूर,

(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक २७ जुलै २०२४

ठळक बातम्या

1. विकसित भारत २०४७ हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं महत्वाची भूमिका पार पाडू शकतात - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नीती आयोगाच्या बैठकीत प्रतिपादन.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरील 'मन की बात'च्या माध्यमाने देशवासीयांशी संवाद साधणार.
3. देशात वर्तमानात टोल प्रणाली ऐवजी 'सॅटेलाईट टोल कलेक्शन प्रणाली' येणार असल्याची केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा.
4. नागपुरात आज दिवसभर पावसाची रिपरिप; गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट.

आणि

5. भारत आणि श्रीलंके दरम्यानच्या तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज होणार.

****

नीती अयोग

विकसित भारत २०४७ हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं महत्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत नीती आयोगाच्या ९ व्या बैठकीत ते आज बोलत होते. या वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य 'विकसित भारत २०४७' असून त्याच्या ध्येय धोरणांच्या मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसेच सदस्य उपस्थित आहेत. दरम्यान, नीती आयोगाच्या बैठकीत

राज्यांमध्ये भेदभाव केला जात असून आपल्याला बोलायला दिलं नाही, असा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

निती आयोग- नववी बैठक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली निती आयोगाची नववी बैठक नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात सुरू आहे. या बैठकीत आठ विषयांवर चर्चा केली जाणार आहे. त्यामध्ये पिण्याचं पाणी, आरोग्य, शिक्षणातील गुणवत्ता, जमीन आणि संपत्तीची डिजीटल नोंदणी, सायबर सुरक्षा, सरकारी कामकाजात कृत्रिम बुद्धीमत्ता अर्थात एआयचं आव्हान, केंद्रीय योजना आणि राज्य शासनांची भूमिका आदी विषयांचा समावेश आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. भारताची युवा कार्यशक्ती हे संपूर्ण जगासाठी एक मोठे आकर्षण आहे. आपल्या तरुणांना कुशल आणि रोजगारक्षम कार्यशक्ती बनवण्याचे आपले ध्येय असले पाहिजे. विकसित भारत @ 2024 बनवण्यासाठी कौशल्य, संशोधन, नाविन्य आणि नोकरीवर आधारित ज्ञानावर भर देणे आवश्यक आहे असं पंतप्रधान म्हणाले. या बैठकीला राज्य तसंच केंद्र शासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, उपराज्यपाल, विशेष निमंत्रीत सदस्य म्हणून केंद्रीय मंत्री आणि निती आयोगाचे उपाध्यक्ष उपस्थतीत आहेत.दरम्यान, काँग्रेससह इंडिया आघाडीच्या काही मुख्यमंत्र्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला आहे.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या आकाशवाणी वरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या तिसऱ्या सरकारच्या कार्यकाळातला ‘मन की बात’चा हा दुसरा आणि एकूण एकशे बारावा भाग आहे.

अजित पवार

काही प्रसारमाध्यमांमध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' या योजनेला वित्तविभागाचा विरोध असल्याच्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसारमाध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'एक्स' वर पोस्ट करून केले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशस्वीतेसाठी अधिकाधिक भगिनींना सहभागी करून घेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहनही पवार यांनी केले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना

राज्याच्या वर्ष २०२४ - २५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात ही योजना सादर केली आहे. वित्त व नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्यमंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात केल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

शरद पवार

आगामी विधानसभा निवडणुकासंदर्भात महाविकास आघाडीची चर्चा झाली असून संसदेच्या अधिवेशनानंतर जागावाटपासंबंधीची चर्चा पुढे जाईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीनंतर अजित पवार यांच्यासोबत गेलेले परभणीचे विधानपरिषदेचे आमदार बाबाजानी दुर्रानी यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. जे विचारानं आमच्यासमवेत आहे, त्यांना पक्षात परत घेण्यासंबंधी पक्षाचे नेते निर्णय घेतील, असं पवार म्हणाले.

आत्मसमर्पण

येत्या २८ तारखेपासून सुरु होणाऱ्या नक्षल्यांच्या शहीद सप्ताहाच्या पूर्वसंध्येला नक्षल्यांच्या टेलर टीमची कमांडर रिना बोर्रा नरोटे उर्फ ललीता हिने आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. शासनाने तिच्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ३६ वर्षीय रिना नरोटे ही भामरागड तालुक्यातील बोटनफुंडी येथील रहिवासी असून, २००६ मध्ये ती पेरमिली दलमची सदस्य झाली. दुसऱ्या वर्षी तिने सप्लाय टीममध्ये काम करण्यास सुरुवात केली. पुढे शिवणकलेचे प्रशिक्षण घेतल्यानंतर २०१४ पर्यंत ती टेलर टीमची सदस्य म्हणून काम करीत राहिली. याच वर्षी ती टेलर टीमची कमांडर झाली. तिच्यावर चकमक आणि खून असे दोन गुन्हे दाखल आहेत.

सॅटेलाईट टोल कलेक्शन प्रणाली

देशात वर्तमानात सुरू असलेली टोल प्रणाली बंद होणार आहे. त्याऐवजी देशात 'सॅटेलाईट टोल कलेक्शन प्रणाली' येणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल केल्याच हिंदुस्थान वृत्तसंस्थेनं दिलेल्या बातमीत म्हटले आहे. यासंदर्भात नितीन गडकरी म्हणाले की, सध्याची टोल प्रणाली बंद करत आहे. लवकरच सॅटेलाइट आधारित टोल कलेक्शन प्रणाली सुरू करण्यात येईल. याचा उद्देश, टोल कलेक्शन वाढवणे आणि टोल

प्लाझावरील गर्दी कमी करणे असा आहे. राज्यसभेतही एका लेखी उत्तरात गडकरी म्हणाले होते की, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (जीएनएसएस) कार्यान्वित करणार आहे. मात्र, ही व्यवस्था सध्या केवळ काही निवडक टोल प्लाझांवरच सुरू होईल. यापुढे सॅटेलाइटच्या माध्यमाने टोल वसूल केला जाईल. आपल्या बँक खात्यातून पैसे कापले जातील आणि आपण जेवढे अंतर कापाल, त्यानुसार पैसे घेतले जातील. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हींचीही बचत होईल असे गडकरी यांनी सांगितले.

हवामान

विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जरी करण्यात आला असून, अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या परवा आणि येत्या **31** जुलैपर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  दरम्यान नागपूर मध्ये आज सकाळपासून पावसाची रिपरिप  सुरू असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला  असून शेतीच्या पिकांसाठी पाऊस उपयुक्त  आहे**.** चंद्रपूर  जिल्ह्यात  पावसाचा  ऑरेंज  अलर्ट  असल्याने  शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली. गेल्या **24** तासात गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड इथं **66.6** मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद करण्यात आली  असून  त्या  पाठोपाठ  चंद्रपूर  जिल्ह्यातील  सावली  इथं **26.8**  मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे**.**

डॉ.नितीन राऊत

उत्तर नागपुर विधानसभा क्षेत्रात अनेक मुलभूत सुविधांची कामं पूर्णत्वास जात आहे. अनेक नव्या कामांना चालना मिळाली आहे. ही सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत, ती गुणवत्तापूर्ण असावीत असं प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत यांनी केलं. ते काल उत्तर नागपुर विधानसभा क्षेत्रात प्रभाग क्रमांक १३ अंतर्गत विविध विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते.

अप्परवर्धा धरणग्रस्त

अमरावती  जिल्ह्यातील मोर्शी  इथल्या अप्पर वर्धा धरणग्रस्त कृती समितीच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अमोल महल्ले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई  इथल्या  बंगल्यावर भेट घेत

अप्परवर्धा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. चर्चा झाल्यानंतर धरणग्रस्त शेतकऱ्यांची संख्या त्यांच्या जमिनीच्या माहितीचा संपूर्ण अहवाल उपमुख्यमंत्र्यांनी राज्याचे सचिव दीपक कपूर यांना मागितला आहे. त्यामुळे धरणग्रस्तांच्या बरेच वर्षापासूनच्या मागण्यांवर तोडगा निघण्याची शक्यता निर्माण झाल्याचं वृत्त हिंदुस्थान समाचार वृत्त संस्थेनं दिलं आहे.

टी-ट्वेंटी

क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंके दरम्यानच्या तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज होणार आहे. श्रीलंकेतल्या पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ही मालिका खेळणार आहे. गौतम गंभीर यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ही पहिलीच मालिका आहे. महिला क्रिकेटमध्ये टी ट्वेंटी आशिया चषक स्पर्धेत काल भारताने बांगलादेशचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. स्पर्धेचा अंतिम सामना भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यात उद्या रंगणार आहे.

*****